जिल्हा परिषद कर्मचा-यांनी घेतलेल्या वैद्यकीय उपचारांवर झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक वैप्रबि-१०९७/प्र.क्र. ३१५/२०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: १ जुलै, १९९७

परिपत्रक

जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांना किंवा त्यांच्या कुटुंबासाठी शासन मान्य रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकीय उपचारांवर झालेल्या खर्चाची सामान्यत: संपूर्ण प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यात आलेली आहे. शासनाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, जिल्हा परिषद कर्मचा-यांना अथवा त्यांच्या कुटुंबीयांना वैद्यकीय खर्च उपचारार्थ झालेल्या वेगवेगळ्या कालावधीच्या खर्चाची बेरीज करुन प्रस्ताव रु. २०,०००/- कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्याने शासनाकडे मान्यतेसाठी पाठविले जातात.

याबाबत आता असे निदर्शनास आणण्यात येते की, तातडीच्या आजारासंबंधी वेगवेगळ्या कालावधीसाठी घेतलेल्या वैद्यकीय उपचारार्थ झालेला खर्च हा वेगवेगळा ठरविणे आवश्यक आहे. सदर वेगवेगळ्या कालावधीच्या खर्चाची एकूण बेरीज करता येणार नाही. प्रत्येक व्यक्तिगत प्रकरणामध्ये वेगवेगळा आंतररुग्ण कालावधीची प्रकरणे सार्वजनिक आरोग्य विभाग, दि. १४.१.१९९३ च्या शासन निर्णयानुसार रु. २०,०००/- पर्यंतच्या कमाल मर्यादेत वेगवेगळ्या निर्णायक ठरविण्यात यावेत. आंतररुग्ण कालावधी सलग असला तरी व्यक्तिगत प्रकरण हे एक प्रकरण मानून रु. २०,०००/- च्या मर्यादेत निर्णायक ठरवावेत. परंतु आंतररुग्ण कालावधी हा जर वेगवेगळा असला तर त्या प्रकरणाची पुढील आंतररुग्ण प्रकरणांशी सांगड घालण्यात येऊ नये. ते प्रकरण स्वतंत्रपणे हाताळण्यात यावे.

सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

हे परिपत्रक सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ज. नं. पिंपळे]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद [सर्व]

प्रतिलिपी
१] विभागीय आयुक्त [सर्व]
३] जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद [सर्व]
४] सार्वजनिक आरोग्य, आरोग्य आ-७, मंत्रालय, मुंबई-३२
५] वित्त विभाग, सेवा-५, मंत्रालय, मुंबई
६] निवड नस्ती, का.क्र. २०
२] मुख्य लेखा व वित्त अधिकारी [सर्व जिल्हा परिषद]


www.lekhamitra.blogspot.com

www.lekhamitra.blogspot.com